RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक १६६] बुधवार, ऑक्टोबर २८, २०२६/कार्तिक ६, शके १९४८ [पृष्ठे ६, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ५९३

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

महसूल विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ ऑक्टोबर, २०२६.

आदेश

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम.

क्रमांक मुद्रांक-२०२५/प्र.क्र. १५३/मुद्रांक-२.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, क्रमांक एमआयपी-२०२३/प्र.क्र.२२३/उद्योग-२, दिनांक २६ ऑगस्ट, २०२४ नुसार, महाराष्ट्र राज्य लॉजिस्टिक्स धोरण-२०२४ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "उक्त धोरण" असा केला आहे) घोषित केलेले आहे, आणि सूक्ष्म, लघू व मध्यम उपक्रम (एमएसएमई) प्रवर्गातील पात्र स्वयंप्रचालित (स्टॅन्डलोन) किंवा स्वतंत्र लॉजिस्टिक्स युनिटांकरिता खरेदीसाठी व त्यात तरतूद केल्याप्रमाणे, दीर्घ मुदतीच्या भाडेपट्टा प्रयोजनार्थ, इतर गोष्टींबरोबरच मुद्रांक शुल्कात कपातीच्या व माफीच्या स्वरूपात आर्थिक प्रोत्साहने देण्याचे ठरविले आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, शासन निर्णय, उद्योग, गुंतवणूक, सेवा व खनिकर्म विभाग, क्रमांक एमएलपी-२०२६/प्र.क्र.२०९/उद्योग-२, दिनांक १६ ऑक्टोबर, २०२६ नुसार, उक्त धोरणात सुधारणा केली आहे.

त्याअर्थी आता, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) महाराष्ट्र राज्यात लागू असताना, त्याच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, जनहितार्थ तसे करणे आवश्यक असल्याची खात्री पटल्याने, उक्त धोरणानुसार स्वयंप्रचालित किंवा स्वतंत्र लॉजिस्टिक्स युनिटे व लॉजिस्टिक्स पार्क्सच्या पात्र प्रवर्गाच्या बाबतीत, अनुसूचीच्या स्तंभ (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या संलेखांवरील, उक्त अधिनियमास जोडलेल्या अनुसूची-एकच्या विविध अनुच्छेदांन्वये अन्यथा आकारण्यायोग्य असलेले मुद्रांक शुल्क, यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट मर्यादेपर्यंत, उक्त धोरण अंमलात असेपर्यंत, पुढील शर्तींस अधीन राहून, कपात व माफ करीत आहे :—

शर्ती.—

(१) याबाबतीत उद्योग, गुंतवणूक, सेवा व खनिकर्म विभागाद्वारे प्राधिकृत केलेली अंमलबजावणी अभिकरणाने किंवा इतर कोणत्याही सक्षम प्राधिकरणाने, मुद्रांक शुल्क माफी प्रमाणपत्र पुरवून, कोणत्याही लॉजिस्टिक्स पार्कची किंवा लॉजिस्टिक्स युनिटची पात्रता प्रमाणित केली पाहिजे.

(२) अंमलबजावणी अभिकरणाने, कोणत्याही पात्र लॉजिस्टिक युनिटाचा किंवा पात्र पार्कचा विकास कालावधी मुद्रांक शुल्क माफी प्रमाणपत्रात विनिर्दिष्ट केला पाहिजे.

(३) या आदेशाखालील मुद्रांक शुल्क माफीचा लाभ, सर्व पात्र लॉजिस्टिक युनिटांना किंवा लॉजिस्टिक पार्कांना त्यांच्या विकास कालावधीमध्ये लागू असेल.

(४) या आदेशास जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे सर्व पात्र लॉजिस्टिक युनिटांना किंवा लॉजिस्टिक पार्कांना या आदेशाखालील मुद्रांक शुल्क माफीचा लाभ लागू असेल.

(५) आदेशाअन्वये ज्याने मुद्रांक शुल्क माफीचा लाभ अगोदरच घेतला आहे असे पात्र युनिट किंवा पार्क, अन्य कोणत्याही आदेशानुसार किंवा धोरणानुसार त्याच संव्यवहारासाठी पुन्हा मुद्रांक शुल्क माफीसाठी हक्कदार असणार नाही.

(६) एमएसएमई प्रवर्गातील पात्र स्वतंत्र / स्वयंप्रचालित (स्टॅन्डलोन) लॉजिस्टिक युनिटांसाठी या आदेशाअन्वये मुद्रांक शुल्क माफी, किमान पंधरा (१५) वर्षांच्या दीर्घकाली भाडेपट्टा करारनामा असलेल्या युनिटांसाठीच केवळ लागू असेल.

(७) ज्या पात्र युनिटाने किंवा पार्कने, हा आदेश, **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध होण्याच्या दिनांकापूर्वीच आधीच मुद्रांक शुल्काचे प्रदान केले आहे, त्या युनिटाला किंवा पार्कला कोणत्याही प्रकारचा परतावा दिला जाणार नाही.

(८) जे पात्र युनिट किंवा पार्क, यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या संलेखाचा पक्षकार आहे, आणि ज्यासाठी या आदेशाअन्वये मुद्रांक शुल्काची माफी मंजूर करण्यात आली आहे, आणि जे उक्त पात्र युनिटाचे किंवा पात्र पार्कचे प्रयोजन किंवा उद्दिष्टे पूर्ण करण्यास अपयशी ठरले आहेत किंवा ज्याने या आदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या शर्तींपैकी कोणत्याही शर्तीचा भंग केला आहे, असे कोणतेही पात्र युनिट किंवा पार्क जणू काही सुरुवातीपासूनच मुद्रांक शुल्कात कोणतीही माफी मिळालेली नव्हती असे समजून संपूर्ण मुद्रांक शुल्क व शास्ती, कोणतीही असल्यास, प्रदान करण्यास पात्र असेल.

(९) उक्त पात्र युनिटाकरिता किंवा पार्काकरिता विनिर्दिष्ट केलेल्या अंमलबजावणी अभिकरणाने, ज्या युनिटाने किंवा पार्काने, या आदेशाअन्वये मुद्रांक शुल्क माफीचा लाभ घेतला आहे, परंतु जे युनिट किंवा पार्क, उक्त पात्र युनिटचे किंवा पार्कचे प्रयोजन किंवा उद्दिष्टे पूर्ण करण्यात निष्फळ ठरले आहे किंवा ज्या युनिटाने किंवा पार्कने, या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही शर्तींचा भंग केला आहे, त्या युनिटची किंवा पार्कची नावे व तपशील, नोंदणी महानिरीक्षक आणि मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियमितपणे कळविली पाहिजे.

स्पष्टीकरण.—

(१) या आदेशाअन्वये तरतूद केलेला मुद्रांक शुल्क माफीचा लाभ, उक्त धोरणांतर्गत पात्र लॉजिस्टिक युनिट आणि त्यानंतरचे लॉजिस्टिक युनिट यांच्यामध्ये निष्पादित केलेला भाडेपट्टा, अभिहस्तांतरण, भाडेपट्टा हक्कांचे अभिहस्तांकन किंवा विक्री प्रमाणपत्र या मार्गाने संपादित केलेल्या जमिनीच्या हस्तांतरणाच्या संलेखास किंवा दस्तऐवजास/दस्तऐवजांना लागू असणार नाही.

(२) या आदेशाअन्वये तरतूद केलेला मुद्रांक शुल्क माफीचा लाभ, उक्त धोरणांतर्गत पात्र लॉजिस्टिक पार्क आणि त्यानंतरचा लॉजिस्टिक्स पार्क यांच्यामध्ये निष्पादित केलेला भाडेपट्टा, अभिहस्तांतरण, भाडेपट्टा हक्कांचे अभिहस्तांकन किंवा विक्री प्रमाणपत्र या मार्गाने निष्पादित केलेल्या जमिनीच्या हस्तांतरणाच्या संलेखास किंवा दस्तऐवजास/दस्तऐवजांना लागू असणार नाही.

(३) उक्त धोरणांतर्गत पात्र लॉजिस्टिक युनिट आणि त्यानंतरचे किंवा पुढील लॉजिस्टिक युनिट यांच्यामधील पुढील संव्यवहार, अथवा पात्र लॉजिस्टिक पार्क आणि त्यानंतरचा किंवा पुढील पात्र पार्क यांच्यामधील संव्यवहार, या आदेशान्वये मुद्रांक शुल्काच्या माफीस पात्र असणार नाही. अशा प्रकारे, युनिट ते युनिट संव्यवहार किंवा पार्क ते पार्क संव्यवहार, या आदेशान्वये मुद्रांक शुल्क माफीस पात्र असणार नाही.

अनुसूची

अनुक्रमांक	पात्र युनिट व प्रक्षेत्र म्हणून लॉजिस्टिक्स युनिटाचा किंवा लॉजिस्टिक्स पार्कचा प्रकार	सूट देण्याची मर्यादा	अधिनियमाच्या अनुसूची एकच्या अनुच्छेदांखालील संलेखांचे प्रकार.
(१)	(२)	(३)	(४)
क	सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम प्रवर्गातील स्वयं-प्रचालित/स्वतंत्र लॉजिस्टिक्स युनिटे		हक्क विलेख निक्षेपाशी संबंधित असणारा दीर्घ मुदती कर्ज करारनामा (अनुच्छेद-६).
१	खरेदीवर किंवा दीर्घ मुदतीच्या भाडेपट्टा करारनाम्यावर (किमान १५ वर्षे) मान्यताप्राप्त पार्कमधील युनिटे	७५%	विक्री प्रमाणपत्र (अनुच्छेद-१६)
२	खरेदीवर किंवा दीर्घ मुदतीच्या भाडेपट्टा करारनाम्यावर (किमान १५ वर्षे) मान्यताप्राप्त पार्कबाहेरील युनिटे	५०%	अभिहस्तांतरण (अनुच्छेद-२५)
ख	लॉजिस्टिक्स पार्क		गहाण मालमत्तेवरील पुढील प्रभार (अनुच्छेद-३३)
३	प्रक्षेत्र एक आणि दोन मधील लॉजिस्टिक्स पार्क	१००%	भाडेपट्टा (अनुच्छेद-३६)
४	प्रक्षेत्र तीन मधील लॉजिस्टिक्स पार्क	७५%	गहाणखत (अनुच्छेद-४०) आणि अभिहस्तांकनाद्वारे भाडेपट्ट्याचे हस्तांतरण (अनुच्छेद-६०)

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सत्यनारायण एस. बजाज,
शासनाचे सह सचिव.

UNCOMPLYCATE Simplifying Compliance

REVENUE DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 28th October, 2026.

Order

MAHARASHTRA STAMP ACT.

No. Mudrank-2025/CR-153/M-2(Policy).—Whereas the Government of Maharashtra has *vide* the Government Resolution, Industries, Energy, Labour and Mining Department, No. MIP-2023/C.R.223/IND-2, dated the 26th August 2024, declared the Maharashtra State Logistics Policy-2024 (hereinafter referred to as " the said policy") and decided to provide *inter alia* fiscal incentives in the form of reduction and remission of stamp duty for the eligible standalone or independent logistics units in the Micro, Small, and Medium Enterprises (MSME) category for purchase and for long term lease purposes, as provided therein;

And Whereas, the Government of Maharashtra has amended the said Policy *vide* Government Resolution, Industries, Investment, Services and Mining Department, No. MLP-2026/C.R.209/Industries-2, dated the 16th October 2026;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (a) of section 9 of the Maharashtra Stamp Act (LX of 1958) (hereinafter referred to as "the said Act"), the Government of Maharashtra, being satisfied that it is necessary to do so in the public interest, hereby reduce and remit the stamp duty to the extent specified in column (3) of the Schedule appended hereto, as otherwise chargeable under the various Articles of the Schedule-I appended to the said Act, on the instruments specified in column (4) of the Schedule, in respect of the eligible category of standalone or independent logistics units and logistics parks as per the said policy, till the said policy is in force, subject to the following conditions, namely :—

Conditions.—

1. The implementing Agency or any other Competent Authority, authorized by the Industries, Investment, Services and Mining Department in this behalf, must certify the eligibility of any logistics park or logistics unit, by providing stamp duty remission certificate.

2. The implementing Agency must specify the development period of any eligible logistics unit or eligible park in the stamp duty remission certificate.

3. The benefit of stamp duty remission under this Order is applicable to all eligible logistics units or logistics parks during their development period.

4. The benefit of stamp duty remission under this Order is applicable to all the eligible logistics units or logistics parks as specified in the Schedule appended to this Order.

1. The eligible unit or park which has availed of the remission of stamp duty under this Order shall not been titled for remission of stamp duty for the same transaction as per any other Order or Policy.

2. Remission of stamp duty under this order for the eligible independent/standalone logistics units under MSME category, shall be applicable only for those units with long-term lease agreement of minimum fifteen (15) years.

3. No refund shall be granted where the stamp duty has already been paid by any eligible unit or park, prior to the date of publication of this Order in the *Maharashtra Government Gazette*.

4. Any eligible unit or park who is party to the instrument as specified in column (4) of the Schedule appended hereto, for which the remission of the stamp duty is granted under this Order, and who fails to fulfil the purpose or objectives of the said eligible unit or eligible park or commits breach of any of the conditions as specified in this Order, shall be liable to pay the whole stamp duty and penalty, if any, as if there was no remission in the stamp duty from the beginning.

5. The implementing Agency as specified in the said eligible unit or park must convey to the Inspector General of Registration and Controller Stamps, Maharashtra State, Pune on regular basis, the names and details of the units or parks which have availed of remission of the stamp duty under this Order but failed to fulfil the purpose or objectives of the said eligible unit or park or committed breach of any of the conditions as specified in this Order.

Explanation.—

1. The benefit of stamp duty remission provided by this Order shall not apply to the instrument or document/s of transfer of acquired land by way of lease or conveyance or assignment of lease rights or sale certificate executed between the eligible logistics unit and the subsequent logistics unit under the said policy.

2. The benefit of stamp duty remission provided by this Order shall not apply to the instrument or document/s of transfer of acquired land by way of lease or conveyance or assignment of lease rights or sale certificate executed between the eligible logistics park and the subsequent logistics park under the said policy.

3. Further transaction between the eligible logistics unit and the subsequent or the next logistics unit or the transaction between eligible logistics park and subsequent or the next park eligible under the said policy shall not be eligible for the remission of the stamp duty under this Order. Thus unit to unit transaction or park to park transaction shall not be eligible for stamp duty remission under this Order.

Schedule

Sr. No. (1)	Type of logistics unit or logistics park as Eligible Units and Zone (2)	Extent of Remission (3)	The type of Instruments under Articles of the Schedule-I of the Act. (4)
A	Standalone/Independent Logistics Units in MSME category		Term Loan Agreement rrelating to Deposit of Title Deed (Article-6). Certificate of Sale (Article -16) Conveyance (Article -25) Further charge on Mortgaged Propertry (Article -33)
1	Units inside the approved park on purchase or long-term lease agreement (Minimum 15 years)	75%	
2	Units outside the approved park on purchase or long-term lease agreement (Minimum 15 years)	50%	
B	Logistics Parks		
3	Logistics Parks in Zone I and II	100%	

4	Logistics Parks in Zone III	75%	Lease (Article -36) Mortgage Deed (Article-40) And Transfer of Lease by Assignment (Article-60)

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATYANARAYAN S. BAJAJ,
Joint Secretary to Government.

UNCOMPLYCATE
Simplifying Compliance

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.